निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत...
(श्री निलेश राजेंद्र दळवी, परिचर,पं.स.संगमनेर)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग - १
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/६/५३४/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरीत नमूद प्रमाणे

संदर्भ:- १. कार्यालयीन निलंबन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/२०९/२०२० दि. १८/०६/२०२०
२. विभागीय चौकशी अहवाल क्र. विशा ४/खा. चौ./सी. आर. १३६/२०२० दि. २४/०३/२०२१
३. कार्यालयीन अंतिम कारणे दाखवा नोटिस जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/२०१/२०२१ दि. १९/०५/२०२१
४. श्री. दळवी, परिचर यांचेकडील खुलासा दि. २४/०५/२०२१
५. कार्यालयीन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/२५२/२०२१ दि. १३/०७/२०२१
६. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील सुचनापत्र क्र. ५३/२०२१ जा. क्र. ११४३ दि. २१/०१/२०२२
७. कार्यालयीन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/५२३/२०२२ दि. १५/०८/२०२२
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा. क्र. आस्था-१/४६९/२०२६ दि. १८/०५/२०२६
९. कार्यालयीन आदेश जा.क्र. साप्रवि-१/आस्था-४/०७/४४८/२०२६,दि.२९/०७/२०२६
१०.गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-१२०२६/१०१४/, दिनांक ३१२०२६/०८/ समवेत श्री दळवी, परिचर यांचा खुलासा
११. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (७)

श्री निलेश राजेंद्र दळवी, परिचर हे प्राथमिक आरोग्य केंद्र कोळगाव, ता. श्रीगोंदा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी हलगर्जिपणा केल्याने त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये सेवेतुन निलंबित करण्यात आलेले होते.

सदर प्रकरणी विभागीय चौकशी होऊन संदर्भ क्र. २ अन्वये आरोप क्र. १ सिद्ध व आरोप क्र. २ अंशतः सिद्ध झाल्याने संदर्भ क्र. ३ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटिस बजावणेत येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आलेले होते. सदर नोटीशीस संदर्भ क्र. ४ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासा अमान्य करणेत येऊन संदर्भ क्र. ५ अन्वये सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा अंतिम करणेत आलेली होती.

संदर्भ क्र. ५ च्या अनुषंगाने अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे अपील दाखल केले होते. संदर्भ क्र. ६ नुसार अपीलार्थी यांचे अपील अंशतः मान्य करण्यात आले होते व इकडील आदेश दि. १३/०७/२०२१ रद्द करणेबाबत व अपीलार्थी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात यावी व फेर आदेश पारित करणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार दि. २९/०८/२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपीलार्थी यांना बाजू

मांडण्याची वाजवी संधी देण्यात आलेली होती. सदर सुनावणी व अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निकालपत्रास अधीन राहून संदर्भ क्र. ७ अन्वये पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर परिणाम होईल अशारितीने दोन वर्षासाठी रोखणे हि शिक्षा करणेत येऊन सेवेत पुन:स्थापित करणेत येऊन पंचायत समिती संगमनेर येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. ०८ नुसार श्री दळवी निलेश यांचा सेवानिलंबन कालावधीचा निर्णय होणेकरिता विनंती करण्यात आलेली होती. संदर्भ क्र. ०९ नुसार श्री दळवी, यांचा सेवानिलंबन कालावधी हा सेवानिलंबन कालावधी का समजण्यात येवू नये? या बाबत श्री दळवी यांना नोटिस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री दळवी यांनी संदर्भ क्र. १० नुसार खुलासा सादर करुन सेवानिलंबन कालावधी हा सेवानिलंबन कालावधी म्हणून नियमित करु नये अशी विनंती केलेली आहे.

सबब, श्री दळवी यांच्या खुलाशाचे अवलोकन केले असता खुलासा अमान्य करुन श्री निलेश राजेंद्र दळवी, परिचर यांचे सेवानिलंबन समर्थनिय ठरत असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ मधील पोटनियम ७ नुसार दिनांक १८/०६/२०२० ते दिनांक ३१/०१/२०२१ अखेर एकुण २२८ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन मानण्यात येईल असे आदेश देत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री निलेश राजेंद्र दळवी, परिचर, यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. ---20261104040208------ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:12:25
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री निलेश राजेंद्र दळवी, परिचर, पंचायत समिती संगमनेर
व्दारा व प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर

२/- सदर नोटीसीची प्रत संबधीतास बजवून त्याची एका प्रतीवर स्वाक्षरी घेणेत यावी व स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत — मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत — निवडनस्ती